ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# मराठी सौंदर्यविचार : स्वायत्ततावादी व लौकिकतावादी

**प्रा.गजानन चव्हाण**
सहायक प्राध्यापक. मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, मो. ९७३०८८२०९१

साहित्य समीक्षेत १९४० पासून 'सौंदर्यशास्त्र' नावाच्या समीक्षाशास्त्राचा मोठा दबदबा राहिला आहे. मराठीतील हा सौंदर्यविचार समजून घेण्याआधी सौंदर्यशास्त्र हे 'शास्त्रा'च्या कसोटीवर उतरते का ? हे पहाणे क्रमप्राप्त होईल. 'सौंदर्यशास्त्र हे विज्ञान आहे असा दावा करणे म्हणजे पर्यायाने असे म्हणणे की, इतर विज्ञानांना जसा आपला अभ्यासाचा खास प्रांत असतो तसा सौंदर्यशास्त्रालाही स्वतःचा खास प्रांत आहे'. किंवा विज्ञानात जशी सत्यसंशोधनाची पद्धत वापरण्यात येते तशीच सौंदर्यशास्त्रातही वापरता येते का? किंवा या पध्दतीचा वापर करून सौंदर्यशास्त्र आपल्या अभ्यासक्षेत्रातील वस्तुस्थितीचे नियम शोधून काढते व अशा वस्तुस्थितीचा अर्थ लावते का? असे प्रश्न सौंदर्यशास्त्राबाबत उभे करून रा.भा.पाटणकरांनी अशी भूमिका घेतली आहे की, ''सौंदर्यशास्त्र हे स्वतंत्र विज्ञानही नव्हे किंवा मनोविज्ञानाचे उपांगही नव्हे. याचे कारण असे की सौंदर्यशास्त्र कोणत्याच प्रकारचे विज्ञान होऊ शकत नाही. सौंदर्यशास्त्राचे प्रश्न, पध्दती व सिध्दांत आणि विज्ञानाचे प्रश्न पध्दती आणि सिध्दांत यांच्यात मूलगामी भेद आहेत, आणि त्यांची गल्लत करणे विषयाच्या अभ्यासाच्या दृष्टिने अनिष्ट आहे.[१]

मराठीतील सौंदर्यशास्त्राची परंपरा जेमतेम ४०—५० वर्षांची आहे. बा.सी.मर्ढेकरांच्या भाषांतरित स्वरूपात व स्वतंत्रपणे झालेल्या सौंदर्यशास्त्रीय लेखनाने मराठीत सौंदर्यशास्त्राचा पाया घातला गेला. मर्ढेकरपूर्व लेखनात सौंदर्यशास्त्रीय म्हणता येईल असे लेखन नव्हते तर तात्विक समीक्षणात्मक लेखन होते, उदा.वि.का.राजवाडे, श्री. व्यं.केतकर, श्री.कृ.कोल्हटकर, वा.म.जोशी या समीक्षकांचे विशिष्ट साहित्य प्रकारांच्या संदर्भातले तात्विक समीक्षात्मक लेखन दाखवता येते. तात्विक समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र यातील सीमारेषा खूप अस्पष्ट आहेत. सौंदर्यशास्त्रीय लेखनात साहित्याचा नव्हे, तर एकूण कलेच्या संदर्भात एक सिध्दान्तव्यूह रचण्याचा प्रयत्न असतो. साहित्यासह वेगवेगळया कलांचाही व्यूहात्मक विचार येथे अभिप्रेत असतो. या बरोबरीनेच येथे प्रत्यक्ष व तात्विक समीक्षेच्या पातळयांवरील कलाव्यवहाराचे, त्यांतील संकल्पनांचे व विधानांचे आशयात्मक व रूपत्मक पातळयांवरील विश्लेषण अभिप्रेत असते. 'या दृष्टिने मराठीतील मर्ढेकरपूर्वकालीन लेखनाला सौंदर्यशास्त्रीय लेखन म्हणता येणार नाही.'[२]

रा.भा.पाटणकरांचे 'सौंदर्यमीमांसा' हे पुस्तक १९७४ मध्ये, शरदचंद्र मुक्तिबोधांचे, 'सृष्टि, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' हे पुस्तक १९७८ मध्ये, प्रभाकर पाध्ये यांचे 'सौंदर्यानुभव' हे पुस्तक १९७९ मध्ये आणि शरद पाटील यांचे 'अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' हे पुस्तक १९८८ मध्ये प्रकाशित झाले. मराठीत सौंदर्यशास्त्रीय म्हणता येईल असे लेखन १९९० नंतरच्या काळात तुरळक स्वरूपात झाले. द.भि.कुलकर्णी, विवेक गोखले, वामन इंगळे, यांची पुस्तके भा.ज.कविमंडन, रा.भा. पाटणकर यांचे स्फुट लेखसंग्रह, तसेच सौंदर्यशास्त्राची आंबेडकरवादी मांडणी करणारे शरणकुमार लिंबाळे यांचे 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' आणि डॉ. यशवंत मनोहर यांचे 'बुध्दिवादी सौंदर्यशास्त्र' ही पुस्तके इ.स.२००० नंतर प्रकाशित झाली.

**सौंदर्यविचारांच्या मांडणीतील दोन गट—** प्रस्तुत काळात मराठीतील सौंदर्यवादी विचारांमध्ये स्वायत्ततावादी व लौकिकतावादी असे दाने ठळक गट दिसून येतात. बा.सी.मर्ढेकर यांनी कलाकृतींच्या अंगाने मांडलेला स्वायत्ततावादी सौंदर्यसिध्दांत, मर्ढेकरांच्या विचारांमध्ये सुधारणा सुचवणारा माधव आचवलांचा स्वायत्ततावादी सौंदर्यसिध्दांत, प्रभाकर पाध्ये यांनी मनोविज्ञानाच्या आधारे कलानिर्मिती प्रक्रिया व कलानुभव प्रक्रिया या अंगानी मांडलेला स्वायत्ततावादी सौंदर्यसिध्दांत, ही सर्व स्वायत्ततावादी सिध्दांतने मूलतः एकसत्ववादी आहेत. सौंदर्यविचारातील दुसरा गट लौकिकतावादी सौंदर्यविचार हा आहे. ज्यामध्ये द.ग.गोडसे, नरहर कुरूंदकर, रा.भा. पाटणकरांचा व्दिध्रुवात्मकतेचा सिध्दांत, शरदचंद्र मुक्तिबोधांची मार्क्सवादाच्या अंगाने केलेली मांडणी, शरद पाटील

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

यांची अब्राम्हणी साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची मांडणी, शरणकुमार लिंबाळे व डॉ.यशवंत मनोहरांची आंबेडकर वादाच्या अंगाने झालेली मांडणी. ही सर्व मांडणी व सिध्दांतने वेगवेगळया तत्वांचा, निकषांचा आधार घेणाऱ्या आहे.

**मराठी सौंदर्यविचारातील सिध्दांताने –**

बा.सी.मर्ढेकर – मर्ढेकरांनी रूप किंवा घाट (फॉर्म) केंद्रस्थानी ठेवून त्यांची स्वायत्ततावादी मांडणी केली आहे. त्यांच्या मते 'अस्तित्वाचे अंतिम घटक म्हणजे संवेदनांचे आशय आणि अर्थ असतात. संवेदनांच्या आशयाची तर्कशास्त्राच्या नियमांना अनुसरून रचना केली, तर वास्तव विश्व आकाराला येते, आणि त्यांची लयनियमांनुसार रचना केली, तर सुंदर वस्तू अस्तित्वात येते. सौंदर्याच्या, कलेच्या क्षेत्रात विशुध्द संवेदनांना महत्व असते. कलावंताची सोंदर्यवृत्ती विशुध्द संवेदनांमध्ये रममाण होते आणि त्या संवेदनांची रचना करते. 'विशुध्द संवेदना' याचा अर्थ एकाच ज्ञानेंद्रियावर आधारित असलेली आणि जीवनार्थरहित अशी संवेदना. संवाद, विरोध, समतोल या लयनियमांनुसार या विशुध्द संवेदनांची झालेली लयबध्द रचना म्हणजेच सौंदर्य.[३]

**माधव आचवल** –'संचेतन तोल', माधव आचवलांचे सौन्दर्यशास्त्रीय लेखन दोन–चार लेखांपुरतेच मर्यादित आहे. मर्ढेकरांप्रमाणेच त्यांनी अ–लौकिक रूपतत्वाची मांडणी केलेली आहे. त्यांच्या मते चित्र, शिल्प वा वास्तू या दृश्य कलांमधील कलावस्तूची (आर्ट फॅक्ट) जाणीव एका क्षणात होते मात्र त्यातील कलाकृतींची जाणीव मात्र कालामध्ये होत असते. आचवलांच्या मते शब्द, ओळी इ. घटकांच्या वाचनातून भावार्थघटकांच्या अस्तित्वाची व बंदिशीची जी जाणीव रसिकमनात साकारते, तेथेच कवितेला अस्तित्व असते.[४]

**प्रभाकर पाध्ये–** पाध्यांनी आपल्या स्वतंत्र सौंदर्यसिध्दांताची मांडणी 'सौंदर्यानुभव' (१९७९) या ग्रंथात केली आहे. पाध्यांच्या सौंदर्यमीमांसेत संज्ञा, बोधना व प्रतिभा या महत्वपूर्ण कल्पना आहेत. त्यांच्या मते, हे सर्व विश्व म्हणजे ऊर्जा (एनर्जी) आहे. मानवाची संज्ञाशक्ती ही या वैश्विक ऊर्जेचे (युनिव्हर्सल एनर्जी) एक रूप आहे. संज्ञेचा उगम हा वैश्विक उर्जेतूनच झालेला आहे. आपल्या सर्व संज्ञाव्यापाराच्या मुळाशी बोधना (पर्सेप्शन) असते. मानवाच्या सर्व धडपडीमागे त्याची जीवन जगण्याची जबरदस्त इच्छा, जीवनतृष्णा असते. या जीवनतृष्णेतूनच बोधनेची निर्मिती होते, तिचा विकास होतो, मानवाचा बहुतेक जीवन व्यवहार जीवनतृष्णेने ग्रसलेला असतो.एखादया वस्तूचे प्रतिमात्मक रूप आपल्याला जाणवते त्यातून ती 'अमूक' एक वस्तू आहे अशी संकल्पनात्मक जाणीव होते, जीवनतृष्णेशी बांधल्या गेलेल्या अशा बोधनेला पाध्ये 'बध्द बोधना' असे संबोधतात, तर जेथे अनुभवाचा केवळ अनुभवासाठी म्हणून अनुभव घेतला जातो, त्यातून कोणतीही कृती उपेक्षित नसते. ही 'मुक्त' बोधना होय असे पाध्ये सांगतात. पाध्यांच्या दृष्टिने जीवनतृष्णेपासून, म्हणजे कृतीपासून मुक्तता मिळवणारे अनेक व्यापार जीवनात आहेत. म्हणूनच ते स्वायत्त आहेत. जेंव्हा संकल्पनांच्या साहयाने अनुभवाचा अनुभवासाठी अनुभव घेतला जातो, तेंव्हा त्यातून शुध्द तत्वज्ञाने, शुध्द विज्ञाने व शुध्द गणिते अशी संकल्पनात्मक स्वायत्तशास्त्रे निर्माण होतात, आणि जेंव्हा प्रतिमात्मकतेवर भर देवून अनुभवाचा अनुभवासाठी अनुभव घेतला जातो, तेंव्हा कलात्मक अनुभव निर्माण होतो. या अनुभवाच्या प्रक्रियेतील बोधनेला पाध्ये 'कलात्मक बोधना' असे म्हणतात. पाध्यांच्या भूमिकेत संपूर्ण मूल्यव्यवहारच 'मुक्त' ठरतो. 'विज्ञान', 'नीतिशास्त्र','तत्वज्ञान' आणि 'कला' इ. सारेच व्यवहार 'स्वायत्त्व' ठरतात. 'बध्द बोधनेतील' अवस्थांतरे घडवून आणणाऱ्या प्रतिभेला पाध्ये 'बध्द प्रतिभा' म्हणतात आणि 'मुक्त बोधनेतील' अवस्थांतरे घडवणाऱ्या प्रतिभाशक्तीला ते 'मुक्त प्रतिभा' म्हणतात. कलात्मक अनुभव घेण्यासाठी अनुभवाचा आस्वादासाठी आस्वाद, स्वरसरंजनात्मकता ही अनुभवपूर्व अट आहे, असे पाध्ये म्हणतात. अनुभवाकडे स्वरसरंजनात्मक दृष्टिने पाहणे याचा अर्थ असा की, त्या अनुभवाच्या बाहेरचे संदर्भ विचारात घ्यायचे नाहीत. पाध्यांच्या मते कलाकृती हा एक 'मोनॅड' असतो. संस्कृत साहित्यशास्त्रात यालाच 'अन्यूनानतिरिक्त' म्हणतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पाध्यांच्या एकूण भूमिकेत असणाऱ्या 'अडचणी' अनेक समीक्षकांनी उलगडल्या आहेत, पाध्यांनी आपल्या सौंदर्य सिध्दांतनासाठी ज्या मनोविज्ञानाचा किंवा मज्जविज्ञानाचा आधार घेतला आहे त्याचा पाध्यांच्या तात्विक विवेचनाशी काही संबंध आहे असे वाटत नसल्याचे मत 'मिलिंद मालशे' यांनी व्यक्त केले आहे.[५]

**लौकिकतावादी सिध्दांत –**

**सुरेन्द्र बारलिंगे –** जी.ई.मूर या तत्वज्ञाने 'शिव' या पदाविषयी केलेले विवेचन आधाराला घेऊन 'सुंदर' या पदाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न सुरेन्द्र बारलिंगे यांनी 'सौंदर्याचे व्याकरण' या आपल्या पुस्तकात केलेला आहे. बारलिंगे यांच्या मते सौंदर्यविधानातील उद्देश हे वस्तुस्थितीवाचक घटकांनी युक्त असते, तर विधेयपदी 'अस्तित्वविलक्षण' असे 'सुंदर' हे विशेषण असते. सुंदर हे विशेषण उद्देश घटकाचा भाग नसते तसेच उद्देशाचा एखादा भाग सुंदर या विधेयाचा भाग होत नाही. 'सुंदर' ही कल्पना अस्तित्वात येण्यासाठी एक परिस्थिती लागते. ही परिस्थिती अनेक बनलेली असली तरी या घटकांची बेरीज म्हणजे 'सुंदर' ही कल्पना नव्हे. 'सुंदर' ही कल्पना निरवयव असते. सुंदर वस्तू सौंदर्यवाचक विधानातील उद्देश पदाने वर्णिली जाऊ शकते आणि ती वस्तुस्थितीवाचक घटकांची असते. बारलिंगेच्या या विवेचनावर प्रा.मे.पु.रेगे यांनी 'मराठी टिका' या ग्रंथातून 'तार्किक चूक' केल्याची टीका केलेली आहे.[६]

द.ग.गोडसे यांचा सौंदर्यविचार त्यांच्या 'पोत', 'शक्तिसौष्ठव' 'गतिमानी' व 'ऊर्जायन' या ग्रंथामधून दिसून येतो. त्यांच्या मते विशिष्ट कालखंडातील एकूण सामाजिक–सांस्कृतिक परिस्थिती आणि त्या कालखंडातील कलाविष्कार यांच्यात काही निश्चित नाते असते, हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'पोत' ही कापडाच्या संदर्भातील व दृश्य कलेतील एक रूढ संकल्पना वापरली आहे. कापड ज्या पदार्थापासून बनते तो मूळ पदार्थ म्हणजे 'धागा' तर कलेच्या संदर्भात जाणीव, कापडात धाग्याची उभीऱ्आडवी वीण असते तशी कलेत जाणिवांची उभी–आडवी वीण–कापडाच्या विणीवरून आपल्याला ते कापड निर्माण करणारी यंत्रणा कोणत्या प्रकारची होती याची कल्पना येते. त्याचप्रमाणेच कलात्मक आविष्काराचे पोत तपासले की, त्या आविष्कारामागील जीवनविषयक मूळ निष्ठा, ही निष्ठा व्यक्त करणाऱ्या जाणिवा आणि त्या जाणिवाना मूर्तरूप देऊन आविष्कार घडवून आणणारी यंत्रणा यांचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. गोडसे आपल्या 'पोत' पासून 'ऊर्जायन' पर्यंत एका विशिष्ट विचारव्यूहाची मांडणी करत आहेत असे वाटते. परंतू त्यांची 'पोत' ही संकल्पना नंतरच्या टप्प्यावर जवळपास अदृश्य होते. त्यामुळे एखाद्या गृहीतकाची सलग, एकात्म मांडणी असे या लेखनाचे एकात्म स्वरूप आहे असे वाटत नाही असे वसंत पाटणकर म्हणतात.[७]

**रा.भा.पाटणकर –** व्दिध्रुवात्मकतेचा सिध्दांत. पाटणकरांनी 'सुंदर' या पदाचा एकच एक निश्चित अर्थ असतो का? या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर देऊन आपला कलेविषयीचा व्दिध्रुवात्मकतेचा सिध्दांत मांडला आहे. त्यांच्या मते कला ही अनेकांगी, व्यामिश्र संकल्पना असल्यामुळे तिची एकच एक व्याख्या देता येणे शक्य नाही. ''पुरातन काळापासून आजपर्यंत सौंदर्याविषयी व कलास्वरूपाविषयी जे महत्वाचे सिध्दांत मांडण्यात आले आहेत. ते काळजीपूर्वक तपासले तर त्यांच्यात पुनरावृत्तीप्रमाणे आणखीही एका गोष्टीचे अस्तित्व जाणवते. ही गोष्ट म्हणजे या सिध्दांतात असलेली एक प्रकारची सुसूत्रता. हे सिध्दांत एकमेकांपेक्षा भिन्न असले तरी त्यांच्यात विशिष्ट प्रकारचे नाते दिसते. त्यांचे अगदी स्वाभाविकपणे दोन गटांत विभाजन होते. त्यांतून दोन परस्परविरोधी संकल्पनाव्यूह उभे राहातात. एक संकल्पनाव्यूह सौंदर्य किंवा कलामूल्य स्वायत्त आहे या तत्वावर आधारलेला असून दूसरा सौंदर्य किंवा कलामूल्य जीवनाचे पोषण करतात या तत्वावर आधारलेला आहे असे दिसते. या दोन ध्रुवांना अलौकिकातावाद किंवा स्वायत्ततावाद व लौकिकतावाद अशी नावे देता येतील. अलौकिकतावाद प्राय: रूपाच्या (From) तत्त्वाचा पुरस्कार करताना दिसतो; उलट लौकिकतावाद आशयावर भर देताना दिसतो. ज्यात लौकिक जीवनाचा त्यातील बौध्दिक व व्यवहारात्मक व्यापारांचा, सुख दु:ख व भावना यांचा संबंध येत नाही अशा अर्थरहित संगीतात अलौकितावादाचा विजय झाल्याचे दिसते. उलट, वाड.मयकला हा लौकिकतावादयांचा

बालेकिल्ला आहे असे म्हणता येईल. पण अशी सरळ विभागणी झाली असती तर सौंदर्यशास्त्रज्ञाचे काम फार सोपे झाले असते. दोन प्रकारांच्या कलांची दोन वेगळी सौंदर्यशास्त्रे असतात असे त्याला म्हणता आले असते. एक रूपवादी व दुसरे आशयवादी. पण बहुतेक कलांमध्ये हे दोन्ही ध्रुव निदान बीजरूपाने उपस्थित असलेले दिसतात. त्यांना जिवनाभिमुखही रहावे लागते व लौकिक जीवनाशी संबंध नसलेले रूपतत्वही अंगीकारावे लागते....संगीत व वाड.म्‍यकला..... या कलाही व्दिध्रुवात्मकतेच्या (bi-polarity) अपवाद नाहीत..... ही व्दिध्रुवात्मकता मानवी जीवनाच्या इतर क्षेत्रातही दिसते. माणसाच्या जीवनात अशी अनेक अंगे निर्माण झाली आहेत की जी मूळ जीवनस्त्रोतापासून अलग होवू शकतात आणि त्यांतील काहींना स्वायत्त मूल्य प्राप्त होऊ शकते.[८]

**शरदचंद्र मुक्तिबोध – 'मानुषतेची' संकल्पना**

मुक्तिबांधांच्या मते ललित साहित्याचे वेगळेपण हे तिच्या साधनामुळे, म्हणजे भाषेमुळे निर्माण होते. त्यामुळेच इतर कलाकृतिंप्रमाणे ललित साहित्यकृतीमध्ये स्वयंपुर्णता, संघटना या गोष्टी आवश्यक असल्या, तरी त्या इथे पुरेशा नाहीत. ललित साहित्याचे साधन असलेली भाषा ही सामाजिक संस्था आहे. त्यामुळे भाषेचा वापर करणे, म्हणजे तिच्या सांस्कृतिक विश्वाकडून जगाकडे पाहणे होय. मुक्तिबोधांच्या मते, ललित साहित्याच्या भाषेच्या साहयाने जे विश्व साकार होते, ते जीवनानुभवाशी संवादी असते. मुक्तिबोधांनी या जीवनानुभवाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यांच्यामते लहानपणापासून आपल्या भोवती हळूहळू अर्थपूर्ण बोधनांचे विश्व उभे रहात असते. ती स्वत:च्या 'मतसंबंध्द' किंवा 'शत्रुसबंध्द' वृत्तीतून अर्थपूर्ण असे प्रतिमाविश्व निर्माण करते. या गोष्टींमुळे माणूस खऱ्या अर्थाने परिस्थितीला तोंड देतो आणि आपल्या जीवनात साफल्य निर्माण करतो.[९] मराठीतील प्रचलित समीक्षेबद्दल ते म्हणता 'मराठी टीका चुकीच्या साहित्यशास्त्रीय कल्पनांमुळे उथळ राहिलेली आहे. केवळ ललितकृतीचा आकृतिबंध तपासल्याने ललितकृतीच्या केवळ अवश्योपाधीचाच विचार होतो. एकार्थाकडे दुर्लक्ष करून लयतत्व स्वतंत्रपणे तपासल्याने सामान्य कलाकृतीला असामान्यत्वाचा दर्जा दिला जातो. कधी केवळ चित्रात्मकता पाहून घटकांचे वृत्तिमूलक अंग दूर्लक्षिले जाते व त्यामुळे कलावंताने निर्मिलेल्या घटकांच्या व्यवस्थितीतून वृत्तींची (ॲटिटयूड्स) आपोआप व्यवस्थिती होते ही गोष्ट अजिबात विसरली जाते'.[१०] या निष्कर्षाप्रत येण्यासाठी ते आधी रससिध्दांताचे व नंतर मर्ढेकरांनी मांडलेल्या लयतत्वाचे विश्लेषण करतात. मुक्तिबोध रसविचारातील साधारणीकरणाची संकल्पना स्वीकारतात आणि लयतत्वाला एक अवश्योपाधि म्हणून मान्यता देतात.' मर्ढेकर लौकिक व अलौकिक असा भेद करू शकले नाहीत तेही 'लय' तत्वाच्या स्वीकारामुळेच'[११] असा त्यांचा अभिप्राय आहे.

मुक्तिबोधांची समीक्षाविचारातील सर्वात महत्वाची व मौलिक भर म्हणजे 'मानुषता' ही संकल्पना. त्यांच्या मते मानुषता हे सामाजिक मानवाचे आंतरिक असणे आहे... सामाजिक मूल्यात्म जीवन हा मानवी व्यावहारिक अस्तित्वाचा एक पैलू आहे. तर 'मानुषता' हा त्याच मानवी अस्तित्वाचा दुसरा पैलू होय. एक परिवर्तशील तर दुसरा शाश्वत आहे. एक इतिहासापेक्ष आहे, तर दुसरा इतिहासामध्ये अनुस्युत आहे. मानवी समाजाची एक प्रक्रिया आहे, निसगाशी व्दंव्द साधत घडत जाण्याची; तर दुसरी निसर्गाशी आंतरिक एकात्मता स्थापित असतेपणाची (बीइंग) अनुभूती आहे. एक माणसाचे कालसापेक्ष अस्तित्वरूप आहे, तर दुसरे त्याचे तद्‌गर्भ कालातील सत्त्व (इसेन्स) आहे... 'मानुषता' सदा, सर्वकाळी, सर्वत्र आढळून येते. ती वर्गीय परिस्थितीने निर्मिलेली गोष्ट नव्हे. 'मानुषता' हीच परात्मभावाची वेदना निर्माण करते, संबंध विच्छेदाची यातना प्रत्ययाला आणून देते व आदर्शाचे स्वप्न उभे करते.. ज्याला आपण शाश्वत मानवी मूल्ये म्हणतो ती या मानुषतेच्या (इसेन्स) अधिष्ठानावरील मुल्ये होत. ''मानुषता' हे मानवाचे मुळातले असणे आहे व समाजाची परिवर्तनशीलता ही माणसाची होत जाण्याची (बिकमिंग) प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट मानुषता व प्रत्यक्ष सामाजिकता यांमधील व्दैत नष्ट करणे हेच आहे. मानवी अनुभवामध्ये असणे आणि होत जाणे या दोहोंची एकरसता, एकता साधली गेलेली असते. त्याची जाणीव मात्र कुणाला नसते.''[१२]

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

मुक्तिबोधांचया 'मानुषता'या संकल्पनेच्या मुळाशी परात्मभावाच्या प्रक्रियेची जाणीव आहे. आज परात्मभावाच्या दोन प्रकारच्या संकल्पना अस्तित्वात आहेत; एक गूढ रोमॅटिक आणि दूसरी भौतिक—सामाजिक मुक्तिबोधांच्या 'मानुषाते' संबंधी विचार करताना ते ज्या मार्क्सवादी विचारसरणीच्या बैठकीत संकल्पना मांडत होते त्यापासून ती फारकत घेताना दिसते. श्री. शरदचंद्र मुक्तिबोधांची मानुषतेची, सकलात्म मानुषतेची संकल्पना या निष्कर्षावर मार्क्सवादी ठरत नाही, त्यांनी कसोशीने पाळलेला जडवाद या संकल्पनेच्या मांडणीत लोप पावतो. मानुषता व परात्मभाव या दोन्ही संकल्पना मग आधिभौतिकी, गूढवादी व चिद्‌वादी स्वरूप धारण करतात.[१३] असे असले तरी मुक्तिबोधांची मांडणी भ्रमजन्य, भ्रममूलक म्हणून त्याज्य ठरवावी अशी नाही. मार्क्सवादी साहित्यविचारात त्यांनी मोलाची भर घातली आहे.

**समारोप :—**

मराठी सौंदर्यविचारातील स्वायत्ततावादी आणि लौकिकतावादी अशा प्रमुख संकल्पनांचा आढावा या लेखात घेतला आहे. स्वायत्ततावादी सौंदर्यविचारापेक्षा लौकिकतावादी मांडणी करणारे समीक्षक मराठीत अधिक संख्येने आढळताना दिसतात. विस्तारभयास्वत लौकिकतावादी सौंदर्यविचारात मार्क्स व आंबेडकरी विचाराधारीत मौलिक भर घालणारे कॉ.शरद पाटील, डॉ.शरणकुमार लिंबाळे व डॉ.यशवंत मनोहर यांची संकल्पना स्पष्ट करता आली नाही, परंतू महात्मा फुले, मार्क्स व आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित सम्यक सौंदर्यशास्त्राची मांडणी कॉ.शरद पाटील यांनी केली आहे. ही मांडणी विशिष्ट स्थळकाळाशी, विशिष्ट तत्वप्रणालीशी निगडीत आहे. मार्क्सवाद व फुले आणि आंबेडकर ही व्यापक जीवनदर्शने आहेत. ही जीवनदर्शने म्हणजे सौंदर्यशास्त्र नव्हे, पण या जीवनदर्शनाच्या साहाय्याने वेगळे सौंदर्यशास्त्र निर्माण करता येईल, त्या दृष्टीने या जीवनदर्शनातून काही निकष, काही सौंदर्यशास्त्रीय कोटी निर्माण होतात का हे पहावे लागेल, अलीकडे डॉ.शरणकुमार लिंबाळे व डॉ. यशवंत मनोहर यांनी तसा प्रयत्न केलेला आहे. मार्क्सवादाने या दृष्टिने त्यांच्या सौंदर्यशास्त्रीय कोटी कोणत्या आहेत व त्यानुसार कलाकृतीचा विचार कसा करता येते हे दाखविले आहे. मराठी सौंदर्य विचाराची आगामी वाटचाल मार्क्स, फुले व आंबेडकरी विचारांच्या निकषांवर होईल हे निश्चित.

**संदर्भ सुची :**


१. सौंदर्यमीमांसा —रा.भा.पाटणकर, पृ.२
२. मराठी वाड्.मयाचा इतिहास: खंड.७ भाग ३ पृ.४०९
३. मराठी वाड्.मयाचा इतिहास: खंड.७ भाग ३ पृ.४१२
४. मराठी वाड्.मयाचा इतिहास: खंड.७ भाग ३ पृ.४२८
५. सौंदर्यविचार, स्वायत्ततावाद—मिलिंद मालशे पृ.१९ (मराठी मराठी साहित्य संघ, मुंबई प्रकाशन )
६. म.वा.इतिहास. खंड.७ भाग ३ पृ.४३५
७. म.वा.इतिहास खंड.७ भाग.३ पृ.४३९
८. सौंदर्यमीमांसा — रा.भा.पाटणकर पृ.७१ व ७२
९. सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य —शरदचंद्र मुक्तिबोध पृ.१६
१०. सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य —शरदचंद्र मुक्तिबोध पृ.१६१
११. सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य —शरदचंद्र मुक्तिबोध पृ.१३७
१२. सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य —शरदचंद्र मुक्तिबोध पृ.१४९ ते १५१
१३. सौंदर्यविचार — मार्क्सवादी प्रवाह : संदीप पेंडसे पृ.८४